सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, अपिल शाखा (रिट सेल), मुंबई या कार्यालयाकरिता नवीन पदे निर्माण करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्र. सवरि-१४१७/प्र.क्र.११९/१७/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२,
दिनांक : २२ सप्टेंबर, २०१७

<u>संदर्भ :</u>-१) शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्र. संकीर्ण १००६/६०१/प्र.क्र. ९५/का.८, दि.१५.०२.२००७
२) शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्र.सवरि-१४१७/प्र.क्र.११९/१७/का.८, दि.०७.०९.२०१७
३) सरकारी वकीलांचे कार्यालय, अपिल शाखा (रिट सेल), उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि.१२.०९.२०१७ चे पत्र.
४) याचिका क्र.२१४१/१९९० मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०८.०९.२०१७ रोजी दिलेले आदेश.

<u>प्रस्तावना :</u>-

विधि व न्याय विभागाच्या अखत्यारीतील सरकारी वकील, अपिल शाखा (रिट सेल), उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयासाठी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र-अ मधील अ.क्र.५ नुसार विविध संवर्गातील एकुण ६४ पदे मंजूर करण्यात आली होती. तद्नंतर संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रानुसार सदर कार्यालयास विविध संवर्गातील २६ पदे मंजूर करण्यात आली.

२. मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २१४१/१९९० च्या दि. ०८.०९.२०१७ रोजीच्या सुनावणीच्या वेळी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने सदर कार्यालयासाठी लिपिक-टंकलेखक गट-"क" संवर्गातील ३ पदे व शिपाई गट-"ड" संवर्गातील ६ पदे अशी एकूण ९ नवीन पदे मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करण्याकरिता चक्रीय पध्दतीने उच्च स्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार सरकारी वकील, अपिल शाखा (रिट सेल), उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयासाठी लिपिक-टंकलेखक गट-"क" संवर्गातील ३ पदे व शिपाई गट-"ड" संवर्गातील ६ पदे अशी एकूण ९ नवीन पदे (सोबत जोडलेल्या विवरणपत्र-अ मध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार) निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त पदावर होणारा खर्च "मागणी क्र.जे-१, २०१४ न्यायदान (दत्तमत) ११४ (००) (०१) विधि सल्लागार व समुपदेशी शहर अधिकारी ०१-वेतन (२०१४ ०२९९)" या लेखाशिर्षाखाली त्या त्या वर्षी मंजूर करण्यात येणा-या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५०४/आ.पु.क./२०१७, दि.२१.०९.२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार तसेच उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९२२११४५१५२०१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Akusing Narshi Vasave

Digitally signed by Akusing Narshi Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5ab84183e07eb916b3161523e73f56110b7dfcea4b15e66c8dac75aa76eaad47, cn=Akusing Narshi Vasave
Date: 2017.09.22 11:34:19 +05'30'

(आ. न. वसावे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव.
२) मा.राज्यमंत्री (विधि व न्याय विभाग) यांचे खाजगी सचिव.
३) सर्व विधानमंडळ सदस्य.
४) मा.मुख्य सचिवांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) अतिरिक्त मुख्य सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) सरकारी वकील, अपिल शाखा (रिट सेल), उच्च न्यायालय, मुंबई.
९) महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१,मुंबई.
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
१२) वित्त विभाग/व्यय-५, मंत्रालय, मुंबई.
१३) निवडनस्ती/का.८.

शासन निर्णय क्र.सवरि १४१७/प्र.क्र.११९/१७/कार्या.८, दि.२२.०९.२०१७ सोबतचे विवरणपत्र-अ

कार्यालयाचे नाव	उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिलेली पदे	एकूण पदांचे संवर्गनिहाय विवरण व प्रत्येक पदाची वेतनश्रेणी		
		पदनाम	**मंजूर पदे**	**वेतनश्रेणी**
सरकारी वकील, उच्च न्यायालय, अपिल (रिट सेल), मुंबई	०९ पदे	लिपिक-टंकलेखक गट-“क”	०३	रू. ५२००-२०२०० ग्रेड पे- १९००
		शिपाई गट-“ड”	०६	रू. ४४४०-७४४० ग्रेड पे- १३००
	एकूण ०९ पदे		०९	